**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०४**

विषय क्रमांक- २० शुक्रवार दिनांक ३०/४/२०१०

ठराव क्रमांक- २० शुक्रवार दिनांक ३०/४/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०(४) नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे मा.स्थायी समिती सभेचे निवृत्त होणारे सदस्य चिठ्ठया टाकून ठरविणे.

--**--

**ठराव :-**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम २०(४) नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे मा.स्थायी समिती सभेचे निवृत्त होणारे सदस्य चिठ्ठया टाकून ठरविणे कामी बोलावण्यांत आल्या प्रमाणे मा.स्थायी समितीची सभा क्रमांक ०४ शुक्रवार दिनांक ३०/०४/२०१०रोजी दुपारी २.००वाजता अहमदनगर महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत,औरंगाबाद रोड येथील मा.स्थायी समिती सभागृह येथे भरली असता सदर सभेमध्ये खालील प्रमाणे मा. सदस्य उपस्थित होते.

| अ.नं. | सदस्यांचे नांवे |
|---|---|
| १ | मा.श्री. गाडे संजय बाबुराव , (सभापती, स्थायी समिती) |
| २ | मा.श्रीमती ढवण शारदा दिगंबर |
| ३ | मा.श्री. शेंडगे संजय छगनराव |
| ४ | मा.श्री. पंजाबी जसपालसिंग निरंजनसिंग |
| ५ | मा.श्रीमती शिंदे शिला अनिल |
| ६ | मा.श्रीमती. ढोणे मालन सुरेश |
| ७ | मा.श्री. लोंढे शिवाजी बाळासाहेब |
| ८ | मा.श्री. शेलार नितीन शिवाजी |
| ९ | मा.श्री. पवार दगडू जयवंत |
| १० | मा.श्री. गव्हाळे विजय नाना |
| ११ | मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी |
| १२ | मा.श्री. भोसले गणेश पुंडलिक |
| १३ | मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ |
| १४ | मा.श्रीमती गंभीर इंदरकौर किशनसिंग |
| त्याचप्रमाणे | |
| १ | मा.श्री. शेख नजीर अहमद अ.रज्जाक उर्फ नज्जू पहिलवान |
| २ | मा.श्री. कांबळे रवी दगडू |

हे सन्माननीय सदस्य अनुपस्थित होते.

उपरोक्त प्रमाणे सभेस उपस्थित असलेल्या सदस्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०(४) नुसार निवृत्त होणारे आठ सदस्य ठरविणे कामी मा.स्थायी समितीची सभा बोलावण्यांत यावी अशाबाबत मा.सभापती स्थायी समिती यांना पत्र देण्यात आलेले होते. त्याप्रमाणे आजची सभा निवृत्त होणारे मा.स्थायी समितीचे आठ सदस्य चिठ्ठया टाकून ठरविणे कामी बोलावण्यांत आलेली आहे. मा. शासनाचे गॅझेट मध्ये प्रसिध्द झालेल्या नांवा प्रमाणे मा.स्थायी समिती सदस्यांच्या नांवाच्या चिठ्ठया तयार करून त्यांच्या ठरल्या प्रमाणे सारख्या घडया करण्यांत येवुन त्या एका पारदर्शक प्लॅस्टिकचे बरणीमध्ये टाकून, बरणीचे झाकण लाउत्न, चांगल्या प्रकारे हलविण्यांत येवुन त्या चांगल्या मिक्स करण्यांत येतील व कुमार हर्षद सुदाम कासार या बालक मंदिर महिला मंडळ, दिल्लीगेट येथील शाळेमध्ये इयत्ता तिसरेचे वर्गामध्ये शिकत असलेल्या व दोन्ही डोळयाने अंध असलेल्या विद्यार्थ्या कडून बरणी मधील एक चिठ्ठी काढून त्यावरील नांव सभेस वाचून दाखविण्यांत येईल व पुन्हा बरणी बंद करून त्यामधील चिठ्ठया पुन्हा चांगल्या प्रकारे हलवून मिक्स करण्यात येतील व पुन्हा चिठ्ठी काढण्यात येईल. याप्रमाणे एकूण आठ चिठ्ठया काढून त्यावरील नांव सभेमध्ये वाचून दाखविण्यांत येतील वाचून दाखविलेल्या चिठ्ठया वरीलनांवाप्रमाणे मा.स्थायी समितीचे आठ सदस्य नियमानुसार दिनांक १ मे २०१० रोजी दुपार नंतर मा.स्थायी समितीचे सदस्य म्हणून निवृत्त होतील व राहिलेले सदस्य पुढिल वर्षा पर्यत मा.स्थायी समितीचे सदस्य म्हणून कार्यरत रहातील याप्रमाणे सभेचे कार्यवाही बाबत मा.उपायुक्त (सा.) श्री. अच्युत हांगे साहेब यांनी सभेस सांगितले.

सभेस उपस्थित असलेल्या मा.सदस्यांना निवृत्त होणारे सदस्य चिठ्ठया टाकून ठरविणे कामी मा.स्थायी समितीचे सर्व सोळा सदस्यांच्या नावाच्या चिठ्ठया वाचून दाखविण्यांत आल्या व चिठ्ठयांच्या ठरल्याप्रमाणे घडया करण्यांत येवुन त्या एका पारदर्शक प्लॅस्टिकच्या बरणी मध्ये टाकण्यांत येवुन त्या चांगल्या प्रकारे मिसळण्यांत आल्या व कुमार हर्षद सुदाम कासार यांस बरणी मध्ये घडया करून टाकलेल्या चांगल्या प्रकारे मिसळलेल्या चिठ्ठयापैकी एक चिठ्ठी काढणेस सांगितले त्याने काढलेली चिठ्ठी मा.सभेस वाचून दाखविण्यांत आली. बरणी बंद करून पुन्हा बरणी हलवून चिठ्ठया मिसळण्यांत आल्या व कुमार हर्षद कासार यांस बरणी मधून चिठ्ठी काढणेस सांगण्यात आले. याप्रमाणे एकूण आठ चिठ्ठया काढून त्या मा.सभेस वाचून दाखविण्यांत आल्या त्या चिठ्ठयामधील नांवे पुढिल प्रमाणे.

| अ.नं. | सदस्यांचे नांवे |
|---|---|
| १ | शेंडगे संजय छगनराव |
| २ | शेख नजीर अहमद अ. रज्जाक |
| ३ | पंजाबी जसपालसिंग निरंजनसिंग |
| ४ | गंभीर इंदरकौर किशनसिंग |
| ५ | गव्हाळे विजय नाना |
| ६ | शेलार नितीन शिवाजी |
| ७ | लोंढे शिवाजी बाळासाहेब |
| ८ | कांबळे रवी दगडू |

वरीलप्रमाणे नावे वाचून दाखविण्यांत आल्या प्रमाणे मा. सदस्य दिनांक १/०५/२०१० रोजी दुपार नंतर निवृत्त होतील असे मा.उपायुक्त (सा.) साहेब यांनी सभेस सांगितले.

तद्नंतर बरणीमध्ये राहिलेल्या चिठ्ठयावरील सदस्यांची नांवे सभेस वाचून दाखविण्यांत आली त्यामधील सदस्यांची नांवे पुढिल प्रमाणे

| **अ.नं.** | **सदस्यांचे नांवे** |
|---|---|
| १ | गाडे संजय बाबुराव |
| २ | ढवण शारदा दिगंबर |
| ३ | शिंदे शिला अनिल |
| ४ | ढोणे मालन सुरेश (वहिणी) |
| ५ | पवार दगडू जयवंत |
| ६ | पवार बाळासाहेब रेवजी |
| ७ | भोसले गणेश पुंडलिक |
| ८ | बारस्कर पोपट जगन्नाथ |

उपरोक्त वाचून दाखविल्या प्रमाणे मा.स्थायी समिती सदस्य हे पुढिल वर्षाकरिता स्थायी समिती सदस्य म्हणून कार्यरत राहतील असे जाहिर करण्यांत आले.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.